**फौजदारी प्रक्रिया संहित, १९७३ चे कलम २७२ व २७७ नुसार न्यायालयीन**

**भाषा मराठीत पुरावा**

**अभियोजन पक्षातर्फे साक्षीदार क्र.०५ ची शपथेवर साक्ष**

मी शपथपुर्वक निवेदन करातो की:

माझे नावः विशाल वसंत शेलार,

वयः ३४ वर्षे, व्यवसायः नोकरी,

राहणारः मोरेआळी, रोहा, ता.रोहा, जि.रायगड.

**सरतपासणी अभियोग पक्षातर्फे विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. व्ही. एस. म्हात्रे यांच्यामार्फत :**

०१. दि.२५/११/२०१९ रोजी अंकित मोहिते, रोशन चाफेकर व नितेश जाधव यांनी मला फोन करुन त्यांनी जनावरांचा टेंम्पो पकडून पोलिस स्टेशनला आणल्याचे सांगीतले. त्यावरुन मी व माझे मित्र मयुर कोंडे, अक्षय मोंडे, समिर शितोळे व उमेश सावंत मिळून पोलीस स्टेशनला गेलो. तेथे आम्हाला पिकअप वाहन नोंदणी क्र.एम.एच–०६/बी.जी ३८८५ मध्ये काळया रंगाच्या चार गाई कोंबलेल्या आवस्थेत दिसल्या. तेथे इतर ४०–५० लोक जमा झाले होते. त्याचप्रमाणे तेथे दानिष खान व एक इसम देखील हजर होता.

०२. घटनेचे अनुषंगाने अंकित मोहिते याने पोलीस स्टेशनला फिर्याद दिली होती. पोलीसांनी घटनेच्या अनुषंगाने माझी विचारपूस केली होती व माझे बयाण नोंदविले होते. दानिष खान आज न्यायालयात हजर असून आरोपीचे पिंज–यात बसलेला आहे. मी केवळ त्याला एकटयाला ओळखतो.

सरतपास पूर्ण.

**आरोपीतर्फे उलटतपास विधीज्ञ श्री. डी. एम. वर्मा यांच्यामार्फत सुरू.**

०३. पोलिसांनी माझे बयाण दि.२५/११/२०१९ रोजीचे रात्री नोंदविली होते. पोलीसांनी माझे बयाण मी सांगीतल्या प्रमाणे नोंदविले होते. मी पोलीसांना बयाण देतेवेळी मयुर कोंडे माझे सोबत होता, असे सांगीतले होते. परंतु, सदर बाब पोलीसांनी माझे बयाणामध्ये का नमुद केली नाही याचे कारण मी सांगू शकत नाही.

०४. मी रेप्टाकोर्स कंपनी, धाटाव मध्ये नोकरी करतो. मी तेथे आळीपाळीने तीन्ही शिफ्ट मध्ये काम करतो. हे म्हणणे खरे नाही की, दि.२५/११/२०१९ रोजी माझी नाईट शिफ्ट होती. हे म्हणणे खरे आहे की, माझे घरापासून पोलीस स्टेशन रोहा अंदाजे दहा मिनीटांचे अंतरावर आहे.

०५. हे म्हणणे खरे नाही की, दि.२५/११/२०१९ रोजी अंकित मोहिते, रोशन चाफेकर व नितेश जाधव यांनी मला फोन करुन त्यांनी जनावरांचा टेंम्पो पकडून पोलिस स्टेशनला आणल्याचे सांगीतले नव्हते, त्यावरुन मी व माझे मित्र मयुर कोंडे, अक्षय मोंडे, समिर शितोळे व उमेश सावंत मिळून पोलीस स्टेशनला गेलो नव्हतो, तेथे आम्हाला पिकअप वाहन नोंदणी क्र.एम.एच–०६/बी.जी ३८८५ मध्ये काळया रंगाच्या चार गाई कोंबलेल्या आवस्थेत दिसल्या नव्हत्या, तेथे इतर ४०–५० लोक जमा झाले नव्हते, त्याचप्रमाणे तेथे दानिष खान व एक इसम हजर नव्हता, घटनेचे अनुषंगाने अंकित मोहिते याने पोलीस स्टेशनला फिर्याद दिली नव्हती.

०६. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी माझे बयाण नोंदविले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, रोशन चाफेकर माझा चांगला मित्र आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्याचे सांगण्यावरुन मी आज न्यायालयात साक्ष दिली, मी दानिष

खानला ओळखत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज न्यायालयात खोटी साक्ष दिली.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.　　श्रवणोत्तर स्विकृत,

SUNIL SAKHARAM MAHALE　Digitally signed by SUNIL SAKHARAM MAHALE Date: 2024.04.23 16:23:43 +0530

स्थळ : रोहा.　　(एस. एस. महाले)
दि.२३.०४.२०२४.　　न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, रोहा.